29 FEB 2024 तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठात आता पिकणार 'मोत्यांची शेती'

## गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्राचे उद्घाटन

प्रतिनिधी
कोल्हापूर

अभिनव आणि नवोन्मेषी उपक्रमांना सातत्याने पाठबळ देणारे शिवाजी विद्यापीठ आता खऱ्याखुऱ्या मोत्यांची शेती पिकविण्यास सिद्ध झाले आहे. विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या पुढाकारातून 'गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्रा'चे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांना सडोली दुमाला येथील मोती उत्पादक व प्रशिक्षक दिलीप कांबळे यांच्याविषयी माहिती समजल्यानंतर त्यांनी प्राणीशास्त्र अधिविभागाला त्यांच्याशी संपर्क साधून अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्याविषयी चाचपणी करण्याची सूचना केली होती. त्यानुसार विद्यापीठात हे मोती पिकविणारे केंद्र कांबळे यांच्याच सहकार्यातून उभे राहिले आहे. विभागातील प्राणीशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे हे त्याचे समन्वयक म्हणून काम पाहात आहेत. प्राणीशास्त्र अधिविभागाच्या सकारात्मक प्रतिसादातून हे केंद्र उभे राहिले आहे.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मोती उत्पादन, संशोधन केंद्राचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील. सोबत डॉ. सरिता ठकार, डॉ. आशिष देशमुख, डॉ. नितीन कांबळे, दिलीप कांबळे आदी.**

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाचा प्राणीशास्त्र अधिविभाग अनेक वर्षांपासून अनेकविध समाजाभिमुख उपक्रम राबवित आहे. त्याचा विद्यार्थ्यांनाही लाभ होतो आहे.

विभागातील रेशीमशेतीचा 'सॉईल टू सिल्क' प्रकल्प, फुलपाखरू उद्यान आणि अलिकडच्या काळात सुरू केलेला शोभेच्या मत्स्यउत्पादनाचा प्रकल्पही आहेत. विभागातील विद्यार्थी आणि नागरिक यांना सगळे समुद्रीजीव एकाच ठिकाणी पाहता येतील, अशा पद्धतीचे भव्य मत्स्यालय उभारण्याचाही मनोदय आहे. आज कार्यान्वित करण्यात आलेले गोड्या पाण्यातील मोत्यांच्या उत्पादन व संशोधनाचे केंद्र हेही या मालिकेतील महत्वाचे पाऊल आहे. ही मोत्यांची शेती विद्यापीठ पैशांसाठी करीत नसून ज्ञानसंवर्धनासाठी करीत आहे. पर्ल फार्मिंग या विषयाचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करावा आणि किमान दर वर्षी काही उद्योजक, व्यावसायिक आपल्या विद्यार्थ्यांमधून निर्माण व्हावेत.

यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. एस. आर. यन्कंची, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. सुनील गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष

सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात पिकणार 'मोती'

## प्राणिशास्त्र अधिविभागात केंद्राचे उद्घाटन; अभ्यासक्रम सुरू करण्याची कुलगुरूंची सूचना



कोल्हापूर : दिलीप कांबळे यांच्याकडून जाणून घेताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, सरिता ठकार, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, आशिष देशमुख, नितीन कांबळे

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : अभिनव आणि नवोन्मेषी उपक्रमांना सातत्याने पाठबळ देणारे शिवाजी विद्यापीठ आता खऱ्याखुऱ्या मोत्यांची शेती पिकविण्यास सिद्ध झाले आहे. विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या पुढाकारातून गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्राचे आज कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

कुलगुरू डॉ. शिर्के यांना सडोली दुमाला येथील मोती उत्पादक व प्रशिक्षक दिलीप कांबळे यांच्याविषयी माहिती समजल्यानंतर त्यांनी प्राणिशास्त्र अधिविभागाला त्यांच्याशी संपर्क साधून अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्याविषयी चाचपणी करण्याची सूचना केली होती. त्यानुसार आज विद्यापीठात हे मोती पिकविणारे केंद्र श्री. कांबळे यांच्याच सहकार्यातून उभे राहिले आहे. विभागातील प्राणीशास्त्रज्ञ डॉ. नितीन कांबळे हे त्याचे समन्वयक म्हणून काम पाहात आहेत.

डॉ. शिर्के म्हणाले, 'प्राणिशास्त्र विभागातील रेशीमशेतीचा 'सॉईल टू सिल्क' प्रकल्प, फुलपाखरू उद्यान आणि अलीकडच्या काळात सुरू केलेला शोभेच्या मत्स्यउत्पादनाचा प्रकल्प ही याची काही उदाहरणे आहेत. आपल्या विभागातील विद्यार्थी आणि नागरिक यांना सगळे समुद्रीजीव एकाच ठिकाणी पाहता येतील, अशा पद्धतीचे भव्य मत्स्यालय उभारण्याचा मनोदय आहे. ही मोत्यांची शेती विद्यापीठ पैशांसाठी करीत नसून ज्ञानसंवर्धनासाठी करीत आहे. पर्ल फार्मिंग या विषयाचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करावा आणि किमान दर वर्षी काही उद्योजक, व्यावसायिक आपल्या विद्यार्थ्यांमधून निर्माण व्हावेत, अशा प्रकारे त्यांना प्रशिक्षित करावे.' या वेळी डॉ. आशिष देशमुख, डॉ. सरिता ठकार, एस. आर. यन्कंची, माधुरी वाळवेकर, सुनील गायकवाड उपस्थित होते.

# आता खऱ्याखुऱ्या मोत्यांची शेती करणे शक्य

## कुलगुरू डॉ. शिर्के; गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्राचे उद्घाटन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मोती उत्पादन, संशोधन केंद्राचे उद्घाटन करताना कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के. यावेळी डॉ. सरिता ठकार, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, डॉ. आशिष देशमुख, डॉ. नितीन कांबळे, दिलीप कांबळे आदी. (छाया : पप्पू अत्तार)

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र अधिविभागाने घेतलेल्या पुढाकारातून आता खऱ्याखुऱ्या मोत्यांची शेती पिकविणे शक्य आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांनी केले. 'गोड्या पाण्यातील मोती संवर्धन, संशोधन आणि उत्पादन केंद्रा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

यावेळी डॉ. शिर्के म्हणाले, मडोली दुमाला येथील मोती उत्पादक व प्रशिक्षक दिलीप कांबळे यांच्याविषयी माहिती समजल्यानंतर त्यांनी प्राणीशास्त्र अधिविभागाला त्यांच्याशी संपर्क साधून अशा प्रकारचे प्रशिक्षण केंद्र विद्यापीठातील विद्यार्थ्यांसाठी उभारण्याविषयी चाचपणी करण्याची सूचना केली होती. त्यानुसार विद्यापीठात हे मोती पिकविणारे केंद्र कांबळे यांच्याच सहकार्यातून उभे राहिले आहे. आपल्या विभागातील विद्यार्थी आणि नागरिक यांना सगळे समुद्री जीव एकाच ठिकाणी पाहता येतील, अशा पद्धतीचे भव्य मत्स्यालय उभारण्याचाही मनोदय आहे. आज कार्यान्वित करण्यात आलेले गोड्या पाण्यातील मोत्यांच्या उत्पादन व संशोधनाचे केंद्र हेही या मालिकेतील महत्त्वाचे पाऊल आहे. ही मोत्यांची शेती विद्यापीठ पैशांसाठी करीत नसून ज्ञानसंवर्धनासाठी करीत आहे. पर्ल फार्मिंग या विषयाचा आपल्या अभ्यासक्रमात समावेश करावा आणि किमान दर वर्षी काही उद्योजक, व्यावसायिक आपल्या विद्यार्थ्यांमधून निर्माण व्हावेत, अशा प्रकारे त्यांना प्रशिक्षित करावे, अशी सूचनाही त्यांनी केली.

यावेळी डॉ. नितीन कांबळे, दिलीप कांबळे यांनी मोत्यांचे फार्मिंग कसे करता येते, याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, डॉ. एस. आर. यन्कंची, डॉ. माधुरी वाळवेकर, डॉ. सुनील गायकवाड आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 FEB 2024
सकाळ

# स्वीडनच्या विद्यापीठासमवेत सामंजस्य करार

## नॅनो पार्टिकल, तंत्रज्ञानाच्या संशोधनाला मिळणार गती



कोल्हापूर : स्वीडनमधील एम.आय.डी. स्वीडन विद्यापीठासमवेत सामंजस्य कराराप्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, सागर डेळेकर, जोहान सिडन, जोनास आर्टिग्रेन, हॅन्स-एरिक निल्सन, एस.बी. सादळे, आदी.

कोल्हापूर, ता. २८ : 'हरित ऊर्जा साधनांच्या संशोधनात शिवाजी विद्यापीठ करीत असलेले संशोधनकार्य महत्त्वाचे असून, या विद्यापीठाशी सामंजस्य करार करीत असताना मोठा आनंद होत आहे', अशी भावना स्वीडन येथील एम.आय. डी. स्वीडन विद्यापीठाचे उप-कुलगुरू प्रा. हॅन्स-एरिक निल्सन यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ आणि एम.आय. डी. स्वीडन विद्यापीठ यांच्यादरम्यान आज एक महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, स्वीडन विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे प्रा. जोहान सिडन आणि विज्ञान, तंत्रज्ञान व माध्यम विभागाचे प्रा. जोनास ऑर्टिग्रेन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील यांनी यावेळी शिवाजी विद्यापीठात सुरू असलेल्या संशोधनकार्याची व सुविधांची माहिती दिली. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'युरोपियन इरॅस्मससारख्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठ आपले योगदान देत आहे. अशा आंतरराष्ट्रीय प्रकल्पांच्या संधी दोन्ही विद्यापीठांनी शोधल्या पाहिजेत आणि त्याद्वारे जागतिक समुदायाला योगदान द्यायला हवे.'

यावेळी स्वीडन विद्यापीठाच्या वतीने प्रा. निल्सन यांनी, तर शिवाजी विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. या कार्यक्रमात स्वीडन विद्यापीठातील विद्यमान संशोधक व शिवाजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिनी मनीषा फडतरे या ऑनलाईन माध्यमातून सहभागी झाल्या. यावेळी डॉ. सरिता ठकार, सागर डेळेकर, एस. बी. सादळे, आशिष देशमुख, किरण कुमार शर्मा, सचिन पन्हाळकर उपस्थित होते.

### संयुक्त संशोधनाला मोठी संधी

प्रा. निल्सन म्हणाले, 'स्वीडन विद्यापीठ हे अत्याधुनिक ऊर्जा साधनांच्या निर्मितीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर संशोधन करीत आहे. शिवाजी विद्यापीठ या क्षेत्रातील संशोधनात एक भारतातील अग्रेसर विद्यापीठ आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठासमवेत अकादमिक आणि संशोधकीय सहकार्यवृद्धी करण्याच्या दृष्टीने हा करार करण्यात येत आहे. हरित ऊर्जा साधनांचा मागणीच्या तुलनेत तुटवडा मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे ऊर्जासाधनांची निर्मितीक्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने सिलीकॉन नॅनो पार्टकलसह नॅनोतंत्रज्ञानाच्या संदर्भातही दोन्ही विद्यापीठांना संयुक्त संशोधनाला मोठी संधी आहे.'

29 FEB 2024

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# हरितऊर्जा संशोधनात शिवाजी विद्यापीठाचे योगदान महत्त्वाचे

## स्वीडन विद्यापीठाचे उप–कुलगुरू प्रा. हॅन्स–एरिक निल्सन यांचे मत : संशोधन विकासाच्या संधी

- **स्वीडन विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार**



**कोल्हापूर : स्वीडनमधील एम. आय. डी. स्वीडन विद्यापीठासोबत सामंजस्य करार प्रसंगी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के व प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासमवेत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. सागर डेळेकर, स्वीडनचे प्रा. जोहान सिडन, प्रा. जोनास आर्टिग्रेन, उप–कुलगुरू प्रा. हॅन्स–एरिक निल्सन, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. आशिष देशमुख, डॉ. किरण कुमार शर्मा, डॉ. सचिन पन्हाळकर आदी.**

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

हरित ऊर्जा साधनांच्या संशोधनात भारतातील शिवाजी विद्यापीठ करीत असलेले संशोधनकार्य महत्त्वाचे असून या विद्यापीठाशी सामंजस्य करार करीत असताना मोठा आनंद होत आहे, अशी भावना स्वीडन येथील एम. आय. डी. स्वीडन विद्यापीठाचे उप–कुलगुरू प्रा. हॅन्स–एरिक निल्सन यांनी व्यक्त केली.

शिवाजी विद्यापीठ आणि एम. आय. डी. स्वीडन विद्यापीठ यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. स्वीडन विद्यापीठाच्या वतीने प्रा. निल्सन यांनी, तर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या.

प्रा. निल्सन म्हणाले, स्वीडन विद्यापीठ अत्याधुनिक ऊर्जा साधनांच्या निर्मितीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर संशोधन करीत आहे. त्यासाठी नॅनो आणि मटेरियल सायन्समधील संशोधन महत्त्वाचे आहे. शिवाजी विद्यापीठ या क्षेत्रातील संशोधनात एक भारतातील अग्रेसर विद्यापीठ आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठासमवेत अकादमिक आणि संशोधकीय सहकार्यवृद्धी करण्याच्या दृष्टीने हा करार करण्यात येत आहे. हरित ऊर्जा साधनांचा मागणीच्या तुलनेत तुटवडा मोठ्या प्रमाणात आहे. त्याचप्रमाणे ऊर्जासाधनांची निर्मितीक्षमता वाढविण्याच्या अनुषंगाने सिलीकॉन नॅनो पार्टकलसह नॅनोतंत्रज्ञानाच्या संदर्भातही दोन्ही विद्यापीठांना संयुक्त संशोधनाला मोठी संधी आहे.

प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठात सौरऊर्जा उपकरणांसह आधुनिक हरित ऊर्जाविषयक संशोधन सुरू आहे. दक्षिण कोरिया, तैवान, जपान आदी देशांतील विद्यापीठांसमवेत शिवाजी विद्यापीठाचे सामंजस्य करार झाले असून त्यांच्यासमवेत संयुक्त संशोधन प्रकल्पही सुरू आहेत. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, युरोपियन इरॅस्मससारख्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठ योगदान देत आहे. आंतरराष्ट्रीय प्रकल्पांच्या संधी दोन्ही विद्यापीठांनी शोधल्या पाहिजेत आणि त्याद्वारे जागतिक समुदायाला योगदान द्यायला हवे. दोन्ही विद्यापीठांतील विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधक यांच्यासाठी या सामंजस्य कराराने संयुक्त संशोधन विकासाच्या अनेक संधी मिळतील.

या कार्यक्रमात स्वीडन विद्यापीठातील संशोधक व शिवाजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिनी मनिषा फडतरे या ऑनलाईन सहभागी झाल्या. यावेळी स्वीडन विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे प्रा. जोहान सिडन आणि विज्ञान, तंत्रज्ञान व माध्यम विभागाचे प्रा. जोनास ऑर्टिग्रेन, डॉ. सरिता ठकार, डॉ. सागर डेळेकर, डॉ. एस. बी. सादळे, डॉ. आशिष देशमुख, डॉ. किरण कुमार शर्मा, डॉ. सचिन पन्हाळकर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
29 FEB 2024 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्वीडनच्या विद्यापीठासमवेत शिवाजी विद्यापीठाचा सामंजस्य करार

कोल्हापूर : प्रतिनिधी

हरित ऊर्जा साधनांच्या संशोधनात भारतातील शिवाजी विद्यापीठ करीत असलेले संशोधनकार्य महत्त्वाचे असून या विद्यापीठाशी सामंजस्य करार करीत असताना मोठा आनंद होत आहे, अशी भावना स्वीडन येथील एम. आय. डी. स्वीडन विद्यापीठाचे उप-कुलगुरू प्रा. हॅन्स-एरिक निल्सन यांनी व्यक्त केली.

येथील शिवाजी विद्यापीठ आणि एम.आय. डी. स्वीडन विद्यापीठ यांच्यादरम्यान आज एक महत्त्वाचा सामंजस्य करार करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, स्वीडन विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे प्रा. जोहान सिडन आणि विज्ञान, तंत्रज्ञान व माध्यम विभागाचे प्रा. जोनास ऑर्टिग्रेन यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम झाला.

प्रा. निल्सन म्हणाले, स्वीडन विद्यापीठ हे अत्याधुनिक ऊर्जा साधनांच्या निर्मितीच्या अनुषंगाने मोठ्या प्रमाणावर संशोधन करीत आहे. त्यासाठी नॅनो आणि मटेरियल सायन्समधील संशोधन महत्त्वाचे आहे. शिवाजी विद्यापीठ या क्षेत्रातील संशोधनात एक भारतातील अग्रेसर विद्यापीठ आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठासमवेत अकादमिक आणि संशोधकीय सहकार्यवृद्धी करण्याच्या दृष्टीने हा करार करण्यात येत आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, शिवाजी विद्यापीठात सौरऊर्जा उपकरणांसह आधुनिक हरित ऊर्जाविषयक संशोधन सुरू आहे. दक्षिण कोरिया, तैवान, जपान आदी देशांतील विद्यापीठांसमवेत शिवाजी विद्यापीठाचे सामंजस्य करार झाले असून त्यांच्यासमवेत संयुक्त संशोधन प्रकल्पही सुरू आहेत. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, युरोपियन इरॅस्मससारख्या आंतरराष्ट्रीय प्रकल्पामध्ये शिवाजी विद्यापीठ आपले योगदान देत आहे. अशा आंतरराष्ट्रीय प्रकल्पांच्या संधी दोन्ही विद्यापीठांनी शोधल्या पाहिजेत आणि त्याद्वारे जागतिक समुदायाला योगदान द्यायला हवे. दोन्ही विद्यापीठांतील विद्यार्थी, शिक्षक आणि संशोधक यांच्यासाठी या सामंजस्य कराराने संयुक्त संशोधन विकासाच्या अनेक संधींची कवाडे खुली केली आहेत. त्यांचा लाभ घ्यायला हवा. यावेळी स्वीडन विद्यापीठाच्या वतीने प्रा. निल्सन यांनी, तर शिवाजी विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. या कार्यक्रमात स्वीडन विद्यापीठातील विद्यमान संशोधक व शिवाजी विद्यापीठाच्या माजी विद्यार्थिनी मनिषा फडतरे या ऑनलाईन माध्यमातून सहभागी झाल्या.


यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार, इनोव्हेशन, इनक्युबेशन व लिंकेजेस केंद्राचे डॉ. सागर डेळेकर, आंतरराष्ट्रीय साहचर्य केंद्राचे डॉ. एस. बी. सादळे, प्राणीशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आशिष देशमुख, नॅनो-सायन्स व तंत्रज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. किरण कुमार शर्मा, भूगोल अधिविभागाचे डॉ. सचिन पन्हाळकर आदी उपस्थित होते.

29 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





कोल्हापूर : १) शिवाजी विद्यापीठात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित ग्रंथदिंडीमध्ये कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे सहभागी झाले होते. २) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त काढण्यात आलेल्या ग्रंथदिंडीवेळी मुख्य प्रशासकीय भवन इमारतीसमोर फुगडी खेळ रंगला. (छाया : नाज ट्रेनर)

# सांस्कृतिक विविधता वृद्धिंगत करणे आवश्यक

## डॉ. प्रभाकर देसाई; विद्यापीठात मराठी राजभाषा गौरवदिनी विशेष व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

मराठी भाषेच्या माध्यमातून सांस्कृतिक विविधता वृद्धिंगत करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन सावित्राबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्राध्यापक डॉ. प्रभाकर देसाई यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागातर्फे मराठी भाषा गौरव दिनानिमित्त 'भाषा आणि संस्कृती' या विषयावरील विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे होते. डॉ. गोमटेश्वर पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. देसाई म्हणाले, भाषेच्या साहाय्यानेच सांस्कृतिक राजकारण ताब्यात घेतले जाते. ज्याच्या हाती भाषा, त्याच्याच ताब्यात आशय, नियोजन राहते. हे मोठे भाषिक राजकारण आहे. अशा राजकारणापासून भाषेला दूर राखता येऊ शकते.

भाषेला प्रतीकात्मकतेमध्ये बंदिस्त करणे, तिच्याकडे शस्त्र किंवा उत्पादन म्हणून पाहणे हा खरा असंस्कृतपणा आहे. ज्यावेळी भाषा नेहमीच्या जगण्यातून बाजूला पडायला सुरवात होते, त्यावेळी आपली भाषिक पाळेमुळे तपासून घ्यायला हवीत. सुस्मिता खुटाळे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. सुखदेव एकल यांनी आभार मानले.

### विद्यापीठ परिसरातून ग्रंथदिंडी

मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने मराठी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या प्रांगणातून ग्रंथदिंडी काढली. हुपरीच्या संत बाळूमामा पायी दिंडी मंडळाच्या सदस्यांनी दिंडीमध्ये रंगत आणली. मान्यवरांच्या हस्ते पालखीपूजनाने दिंडीला सुरुवात झाली. पालखीमध्ये भारतीय संविधान, ज्ञानेश्वरी, तुकोबारायांची गाथा यांसह मराठी ग्रंथ ठेवले होते. मुख्य इमारतीसमोर रिंगण सोहळाही रंगला. मराठी बोलींचे फलक घेऊन विद्यार्थी दिंडीत सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 FEB 2024

सकाळ

# विद्यापीठाच्या भुयारी मार्गासाठी सहा कोटींचा निधी वितरित

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व आणि पश्चिम भागाला कायमस्वरूपी जोडण्यासाठी भुयारी आणि सेवा मार्गाचे बांधकाम सध्या सुरू आहे. त्यासाठी राज्य शासनाने पाच कोटी ९८ लाख ८१ हजार ९४५ रुपयांचा निधी आज मंजूर केला. त्याबाबतचा शासन आदेश उच्च व तंत्रशिक्षण विभागाने काढला आहे.

विद्यापीठातील विद्यार्थी, पालक, शिक्षक, नागरिक तसेच अभ्यागत अशा सुमारे दोन ते तीन हजार व्यक्तींची मुख्य रस्त्यावरुन दररोज ये-जा असते. विद्यापीठास विभागणारा हा रस्ता द्रुतगतीचा असल्यामुळे पुणे-बंगळूर एक्स्प्रेस-वे वरून कोल्हापूर शहरात येणाऱ्या व जाणाऱ्या जलदगती वाहनांच्या सातत्याने वाढत्या वर्दळीमुळे विद्यापीठाच्या पूर्व बाजूकडून पश्चिम बाजूकडे ये-जा करणाऱ्या विद्यार्थी, शिक्षकांसाठी हा रस्ता असुरक्षित बनला आहे. त्याअनुषंगाने विद्यापीठाने भुयारी आणि सेवा मार्ग बांधण्यासाठी विद्यापीठाने शासनाकडे ८ कोटी ४८ लाख रुपयांचा प्रस्ताव सादर केला होता. त्याला शासनाने उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मान्यता दिली. त्यानंतर १९ ऑक्टोबरच्या शासन निर्णयाद्वारे दोन कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास वितरित करण्यात आला.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 FEB 2024
लोकमत

# भुयारी मार्गासाठी सहा कोटींच्या निधी वितरणास मंजुरी

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पूर्व व पश्चिम भागाला जोडण्यासाठी भुयारी मार्ग व सर्व्हिस रस्त्याचे काम सुरू असून, या कामासाठी ५ कोटी ९८ लाख ८१ हजार १४५ रुपये इतका निधी वितरित करण्यास शासन निर्णयाद्वारे मान्यता देण्यात आली. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या विशेष प्रयत्नांमुळे विद्यापीठाच्या भुयारी मार्गाच्या कामासाठी महाराष्ट्र शासनाकडून ८ कोटी ४८ लाख ८१ हजार १४५ रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. त्यापैकी पहिल्या टप्प्यात २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी विद्यापीठास प्राप्तही झाला आहे. उर्वरित निधीही वितरित करण्यास मान्यता देण्यात आल्याने या भुयारी मार्गाचे काम जलदगतीने होण्यास मदत होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 FEB 2024
क्रांतिसिंह

# सार्वभौमत्व शिवस्वराज्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य ठरले: डॉ. सुमित्रा कुलकर्णी

कोल्हापूर(प्रतिनिधी):- लोककल्याण आणि सहिष्णुता हा छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्याचा पाया होता, तर सार्वभौमत्व हे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ तथा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या माजी इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अधिविभागातर्फे ३५०व्या शिवस्वराज्य दिनाच्या निमित्ताने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज व्याख्यानमाले अंतर्गत 'मराठा स्वराज्य निर्मिती: एक अवलोकन' या विषयावरील व्याख्यानात त्या बोलत होत्या. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते, तर प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे प्रमुख उपस्थित होते.

डॉ. सुमित्रा कुलकर्णी यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य निर्मितीचा वेध घेत असताना स्वराज्याचे बाह्यरंग, अंतरंग, कार्यपद्धती आणि व्याप्ती या बाबींची अत्यंत अभ्यासपूर्ण मांडणी केली. त्या म्हणाल्या, छत्रपती शिवाजी महाराजांचे स्वराज्य हे त्या काळच्या सामंतशाहीच्या विपरित निर्माण झालेले होते. उत्तर प्रदेशापासून ते तमिळनाडू प्रांतापर्यंत संपूर्ण देशाला त्यातून प्रेरणा देण्याचे कार्य या घटनेने केले. हे स्वराज्य मध्ययुगीन राष्ट्रभावनेचा प्रभावी आविष्कार ठरले. अनेक घटक आणि अनेक प्रक्रियांच्या एकत्रीकरणातून ही स्वराज्यनिर्मिती झाली. छत्रपतींच्या आज्ञापत्रांतून राज्य, स्वराज्य, महाराष्ट्रभूमी अशा शब्दांनी स्वराज्याचे वर्णन दिसून येते. राज्याच्या संकल्पनेमध्ये लोकसंख्या, विशिष्ट लोकसमूहांचा भूप्रदेश, शासन संस्थेचे लोकाभिमुख स्वरुप आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे सार्वभौम हक्क यांचा समावेश होतो. ही सार्वभौमिकता हे छत्रपतींच्या स्वराज्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून सामोरे येते.

स्वराज्यामध्ये राजकीय प्रक्रिया ही कायद्याची बाब म्हणून सामोरी येत असली तरी त्या मध्ये अंतर्भूत सामाजिक-सांस्कृतिक प्रक्रिया आणि आकलन होणाऱ्या मानसिक प्रक्रिया या स्वराज्यनिर्मिती साठी परस्परपूरक भूमिका बजावतात; यामुळे महाराष्ट्रातील सर्व भूमीपुत्रांसाठी उदयाला आलेले राज्य म्हणून स्वराज्याकडे पाहायला हवे. त्यामध्ये सर्व धर्म, जात, पंथ आदींच्या लोकांचा समावेश आहे. ही भूमी कोणा बादशहाची नव्हे, तर तुमची आमची आहे, ही आपलेपणाची भावना लोकांच्या मनात निर्माण झाली, हे छत्रपती शिवाजी महाराजांचे देणे आहे.

त्यांनी तत्कालीन जहागीरदार, वतनदारांचे लक्षही सुलतानांच्या राजनिष्ठेकडून स्वराज्य प्रेरणेकडे वळविले. वतनदार हे वतनाकडे सत्ता, संपत्ती आणि प्रतिष्ठा यांचे प्रतीक म्हणून पाहायचे, त्यामुळे ती दृढमूल बनलेली होती, हे दोष लक्षात घेऊन महाराजांनी त्यावर नियंत्रण आणण्याचे काम केले. वतने राखली, पण महसूल गोळा करण्याच्या पद्धतींवर नियंत्रण आणले. यातून वतन पद्धतीवर, आपल्या मध्यवर्ती राज्य प्रशासनाचा वचक बसविला. त्याचप्रमाणे राज्याभिषेक पद्धतीतून लोकांना स्वराज्याचे अस्तित्व मान्य करावयास भाग पाडले. सुशासनातून आपल्या स्वराज्याचे वेगळेपण दाखवून दिले. महाराजांची आज्ञापत्रे स्वराज्याचे प्रशासकीय तत्त्वज्ञान कळवितात. व्यापारवृद्धी करीत असताना सर्वसामान्य शेतकऱ्याच्या अभ्युदयासाठी त्यांनी सत्तेचा वापर केला. एकछत्री अंमल चालविताना स्वराज्य एकतंत्री होणार नाही, याची दक्षताही त्यांनी घेतली. महाराजांचे राज्य उत्कर्ष होत होत राज्याभिषेकापर्यंत पोहोचले. शिवराज्याभिषेक ही शिवाजी महाराजांनी आरंभलेल्या स्वराज्यनिर्मितीच्या चळवळीची उच्चतम अवस्था आहे. त्याद्वारे पारंपरिक राज्यपदाच्या पलिकडे महाराजांनी आपल्या राजपदाच्या कक्षा व्यापक केल्या. या व्याप्तीनेच ते 'लोकनायक राजा' ठरले.

स्वराज्य निर्मितीची प्रक्रिया ही महाराष्ट्राच्या इतिहासातील, लोक जीवनातील फार महत्त्वाची प्रक्रिया आहे. या भूमीवर छ. शिवाजी महाराजांनी घडविलेल्या राजकीय, सामाजिक-सांस्कृतिक व मानसिक अभिसरणातून येथील लोकांचे जीवनमान, राहणीमान यांमध्ये मोठ्या प्रमाणात बदल होऊ शकला. स्वराज्यप्रेरणेतून त्यांच्या मनी स्वाभिमान जागृत झाला. डॉ. कुलकर्णी यांची अत्यंत शास्त्रीय व अभ्यासपूर्ण मांडणी प्रत्येक घटकासाठी महत्त्वाची आहे. त्यामुळे या व्याख्यानाची पुस्तिका विद्यापीठाच्या छ. शिवाजी महाराज अभ्यास केंद्राच्यावतीने प्रकाशित करण्यात येईल.

कार्यक्रमाच्या सुरवातीला इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. सुस्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. नीलांबरी जगताप यांनी आभार मानले. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. अरुण भोसले, डॉ. एम.ए. लोहार, डॉ. कपिल राजहंस, डॉ. दत्तात्रय मचाले यांच्यासह विविध महाविद्यालयांतील शिक्षक, विद्यार्थी-विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

29 FEB 2024

तरुण भारत

# विद्यापीठ देणार कुस्तीला बळ

- विद्यापीठ प्रशासनाकडून कुस्ती संकुलसाठी १ कोटी निधी मंजूर
- एकाचवेळी मुला-मुलींना करता येणार मॅटवरील कुस्तीचा सराव

**अहिल्या परकाळे**
कोल्हापूर

कुस्तीपंढरी म्हटले की कोल्हापूर आठवते. या कोल्हापूरच्या कुस्तीला बळ देण्याचे काम खऱ्या अर्थाने राजर्षी शाहू महाराजांनी केले. कुस्तीसाठी पोषक वातावरणामुळे लोकांची पाऊले आपोआप कुस्तीपंढरीकडे वळायची. देश, विदेशातील अनेक नामवंत मल्ल सरावासाठी कोल्हापूरला येत असतात. लाल मातीचे आखाडे कोल्हापूर शहरात अनेक ठिकाणी आहेत, मात्र स्पर्धेच्या युगात मॅटवरील कुस्तीचे महत्व ओळखत शिवाजी विद्यापीठ प्रशासनाने यंदाच्या अर्थसंकल्पात कुस्ती संकुलसाठी १ कोटी रुपयांचा निधी मंजुर केला आहे. विशेष म्हणजे, या संकुलात एकाच ठिकाणी मुला आणि मुलींना मॅटवरील कुस्तीचा सराव करता येणार आहे.

कोल्हापुरात प्रत्येक पेठेत एक तालीम आहे. येथे देशभरातील पैलवान सरावासाठी येत असतात. येथील लाल मातीत हजारो पैलवान घडले तर शेकडो पैलवानांनी आपला ठसा उमटवला आहे. परंतू मॅटवरील कुस्तीचा सराव करण्यासाठी पुरेशा सुविधा नसल्याने शिवाजी विद्यापीठाने या कुस्ती संकुलाची निर्मिती करण्याचा निर्णय घेतला आहे.



### सोयी-सुविधांनी सज्ज

क्रीडा विभागाशेजारी व एनसीसी भवनच्या पाठीमागे कुस्ती संकुलाचे बांधकाम सुरू आहे. येत्या काही दिवसात या संकुलाचे बांधकाम पूर्ण होईल. कुस्तीचे दोन हॉल, ५०० ते ६०० लोकांची बैठक व्यवस्था केली जाणार आहे. तसेच पैलवानांना जीम, चेंजिंग रूम आणि इतर सुविधाही येथील उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. खेळाडूंच्या वसतिगृहाचे काम सुरू असून या वसतिगृहात राहून पैलवानांना कुस्तीचा सराव करता येणार आहे. याठिकाणी दर्जेदार वस्तादांमार्फत मॅटवरील कुस्तीचे प्रशिक्षण दिले जाणार असल्याचे कुस्तीपटूंना याच निश्चितच फायदा होणार आहे. भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर नामवंत कुस्तीपटू तयार करण्याचा विद्यापीठ प्रशासनाचा प्रयत्न असणार आहे.

शिवाजी विद्यापीठातील क्रीडा विभागाला अत्याधुनिक खेळांची साधनसामुग्री उपलब्ध करून देण्यात आली आहे. अलीकडील काळात राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर विद्यापीठाचे खेळाडू निरनिराळ्या क्रीडा प्रकारात आपले कौशल्य दाखवत आहेत. आता, अर्थसंकल्पात कुस्ती संकुलासाठी निधी मंजूर करत कुस्तीला आणखी बळ देण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न असणार आहे.




दरम्यान, कुस्तीला बळ देण्याच्या विद्यापीठाच्या या निर्णयाचे स्वागत अनेक क्रीडा प्रेमी व प्रशिक्षकांकडून करण्यात येत आहे.

### वसतिगृहाला २ कोटी रूपये

बी. ए. क्रीडा पदवीचे विद्यार्थी आणि विद्यापीठात खेळासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची राहण्याची सोय व्हावी, यासाठी क्रीडा विभागाचे स्वतंत्र वसतिगृह बांधण्याचे काम सुरु झाले आहे. या वसतिगृहासाठी विद्यापीठाने स्वनिधीतून २ कोटी रुपयांच्या खर्चाला मान्यता दिली आहे. विद्यापीठाच्या इतिहासात प्रथमच खेळाडूंसाठी स्वतंत्र वसतिगृह होणार आहे. या वसतिगृहात खेळाडू राहून दररोज सराव करतील.

### फुटबॉलला प्रोत्साहन

कोल्हापुरातील फुटबॉलपटूंना प्रोत्साहन देत त्यांना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर खेळण्याची संधी मिळावी. तसेच खेळाडूंना सराव करण्यासाठी सुसज्ज मैदानासाठी १० लाख रुपयांची बजेटमध्ये नव्याने तरतूद केली आहे. याचाच अर्थ खेळाडूंना सर्व प्रकारच्या सुविधा देण्यावर विद्यापीठाने भर दिला आहे. तसेच खेळाडूंच्या माध्यमातून कोल्हापुरचा फुटबॉल देश विदेशात पोहचवण्यासाठी विद्यापीठ प्रशासन आग्रही आहे.

मॅटवरील कुस्तीचा सराव करण्यासाठी विद्यापीठात कुस्तीचे संकुल उभारणीचे काम सुरू आहे. येथे महाविद्यालय, विद्यापीठातील खेळाडूंबरोबर होतकरू शालेय खेळाडूंना मॅटवर सराव करता येईल. जास्तीत जास्त सुविधा देत मॅटवरील कुस्ती खेळणाऱ्या पैलवानांची फौज तयार करण्यावर क्रीडा विभाग भर देईल. जेणेकरून मॅटवरही कोल्हापुरचे पैलवान नंबर वनचे पदक मिळवतील.

**– डॉ. शरद बनसोडे (संचालक, क्रीडा विभाग, शिवाजी विद्यापीठ)**

29 FEB 2024

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# खेलो इंडिया ॲथलेटिक्स; विद्यापीठाला ८ पदके

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

गुवाहटी (आसाम) येथे सुरू आसलेल्या चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्समध्ये शिवाजी विद्यापीठाच्या ॲथलेटिक्स संघाने ४ सुवर्ण ३ रौप्य व एक कास्य अशी एकूण ८ पदके पटकावली.

**स्पर्धेत पदकांची कमाई करणारे खेळाडू असे** : सुदेशना शिवणकर (१०० मी. धावणे - सुवर्ण, २०० मी. धावणे रौप्य), रेश्मा केवठे (१० हजार मी. धावणे- सुवर्ण), अभिजीत भोसले (डेक्याथलॉन- सुवर्ण), कुशल मोहिते (डेक्याथलॉन-सुवर्ण), विकास खोडके (११० मी. हर्डल्स - रौप्य), अनुष्का कुंभार (४०० मी. हर्डल्स-कांस्य), प्रतीक पाटील, रिया पाटील, राजवर्धन पाटील, अनुष्का कुंभार (४ बाय ४०० मी. रिले - रौप्य), प्रतीक पाटील (२०० मी.धावणे -चौथा क्रमांक), अनुष्का कुंभार (४०० मी. धावणे-चौथा क्रमांक), प्रतीक पाटील, विकास खोडके, अखिल खोत, सार्थक शेलार (४ बाय १०० मी.रिले- पाचवा क्रमांक).




**कोल्हापूर : चौथ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्सच्या ॲथलेटिक्स स्पर्धेत ८ पदकांची कमाई करणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ. सोबत प्रशिक्षक-मार्गदर्शक.**

सर्व खेळाडूंना संघाचे प्रशिक्षक प्रा. आर. टी. पाटील, संघ व्यवस्थापक डॉ. इब्राहिम मुल्ला आणि डॉ. सविता भोसले यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 FEB 2024
सकाळ




कोल्हापूर : गुवाहाटी येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत चार सुवर्णांसह आठ पदकांची दमदार कामगिरी करणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या संघासोबत उपस्थित प्रशिक्षक.

# शिवाजी विद्यापीठाला चार सुवर्णांसह आठ पदके

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : गुवाहाटी येथे सुरू असलेल्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या मैदानी संघाने चार सुवर्णांसह ८ पदकांची कमाई केली. विशेष म्हणजे सुदेष्णा, रेश्मा, अभिजित, कुशल यांची कामगिरी लक्षणीय ठरली.

मैदानी स्पर्धा प्रकारात सुदेष्णा शिवणकरने १०० मीटर व २०० मीटर धावणेमध्ये अनुक्रमे सुवर्ण व रौप्य पदकाची कमाई केली. रेश्मा केवठेने १० हजार मीटर धावणेमध्ये सुवर्ण, तर डेक्थलॉनमध्ये अभिजित भोसले व कुशल मोहिते यांनीही प्रत्येकी एका सुवर्णपदकाची कमाई केली. विकास खोडकेने ११० मीटर हर्डल्समध्ये व ४०० मीटर हर्डल्समध्ये अनुष्का कुंभारने रौप्य पदकाला गवसणी घातली. सांघिक ४ बाय ४०० मी. रिले मिश्रमध्ये प्रतीक पाटील, रिया पाटील, राजवर्धन पाटील, अनुष्का कुंभार या संघास रौप्यपदक मिळाले. संघाला शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र. कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. शरद बनसोडे यांचे प्रोत्साहन, तर प्रशिक्षक प्रा. आर. टी. पाटील, डॉ. इब्राहिम मुल्ला, डॉ. सविता भोसले, सुभाष पवार, सुनील बाबर, अभिजित मस्कर यांचे मार्गदर्शन लाभले.